म. जा. क्र./3334 /२०२६
दिनांक : ०६/११/२०२६

जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

जाहिरात

ई-कोर्ट प्रोजेक्टच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत जिल्हा न्यायालय नंदुरबार व त्याअंतर्गत जिल्हा न्यायालय-१ शहादा, दिवाणी न्यायालय क. स्तर तळोदा व दिवाणी न्यायालय क. स्तर अक्कलकुवा येथे ई-सेवा केंद्रांसाठी पुरविलेल्या पोर्टा केबिनसाठी **कंत्राटी कर्मचारी (पुढील ११ महिने किंवा अनुदान उपलब्ध असेपर्यंत यापैकी जे काही अगोदर होईल तोपर्यंत) या पदाकरीता एकूण ०४ उमेदवारांची निवड यादी** तयार करण्यासाठी जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकास पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	पदाचे नाव	वेतन (रुपयांमध्ये)
१	ई-सेवा केंद्रांच्या पोर्टा केबिन्ससाठी कंत्राटी कर्मचारी	रु.१५,०००/- (दरमहा)

उमेदवारांनी त्यांचे अर्ज जाहिरातीच्या परिशिष्ट अ मधील नमुन्यानुसार, परिच्छेद 'ड' मध्ये नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे इत्यादींच्या सत्यप्रतींसह लिफाफ्यावर **ई-सेवा केंद्रांच्या पोर्टा केबिन्ससाठी कंत्राटी कर्मचारी या पदाकरीता अर्ज** असे लिहून **दिनांक २०/ ११ / २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी** पोहचतील या बेताने खालील पत्त्यावर टपालाने अथवा कार्यालयीन वेळेत व्यक्तीशः सादर करावेत. सदर मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कुठल्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच पोस्टाद्वारे झालेला विलंब विचारात घेतला जाणार नाही. कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, टोकर तलाव रोड, नंदुरबार
तालुका व जिल्हा नंदुरबार
पिन कोड - ४२५४१२.

ई-सेवा केंद्रांच्या पोर्टा केबिन्ससाठी कंत्राटी कर्मचारी पदाकरिता अटी व शर्ती

अ) पात्रता

१. उमेदवार भारताचा नागरिक असावा.
२. उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधारक असावा.
३. उमेदवारास संगणक व संगणकाशी संबंधित उपकरणे वापरण्याचे व हाताळणीचे ज्ञान असणे तसेच संबंधित परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

वयोमर्यादा - उमेदवाराचे जाहिरातीच्या तारखेस वय किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे असावे.

कामाचे स्वरुप -

ई-सेवा केंद्राबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ई-समितीच्या दि.२५/०४/२०२० रोजीच्या प्रकल्प *अंमलबजावणी करीता दिलेल्या मार्गदर्शक तत्वांमधील तपशिल क्र.४ व ५ मध्ये दिलेल्या बाबीनुसार* काम करण्याची तयारी असावी. (मार्गदर्शक तत्वांमधील तपशिल क्र. ४ व ५ ची प्रत सोबत जोडणेत आली आहे.)

ब) पात्र उमेदवाराकरीता अटी -

१. उमेदवाराचे चारित्र्य आणि वर्तणूक चांगली असावी.
२. उमेदवाराला नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आलेले नसावे किंवा त्याला/ तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवलेले नसावे किंवा त्याच्या / तिच्या विरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

क) निवड प्रक्रिया -

१. Para Legal Volunteers (PLV) असणाऱ्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार केला जाईल.
२. वेळेत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करणेत येईल. अर्जाची छाननी केल्यावर पात्र ठरलेले अर्ज जास्त प्रमाणात असल्यास संगणक समिती, जिल्हा न्यायालय, नंदुरबार योग्य ते निकष लावून अर्हता योग्यतेच्या आधारे ई-सेवा केंद्रांच्या *पोर्टा केबिन्ससाठी कंत्राटी कर्मचारी या पदासाठी अल्पसूची तयार करेल. अशी अल्पसूची (shortlist) तयार करण्याचे* आणि निवड प्रक्रियेचे सर्व अधिकार संगणक समिती, जिल्हा न्यायालय, नंदुरबार यांचेकडे असणार आहेत. मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची यादी दि. २३/११/२०२६ रोजी जिल्हा न्यायालयाचे **https:/nandurbar.dcourts.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

अल्पसूचीप्रमाणे पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल. **मुलाखतीची तारीख व वेळ पात्र उमेदवारांच्या यादीत नमुद करण्यात येईल. त्याबाबत स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.** तसेच आवश्यकता वाटल्यास प्रात्यक्षिक चाचणी घेणेत येईल. मुलाखतीचे वेळापत्रकाप्रमाणे कोणता बदल झाल्यास त्याची माहिती जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. पदासाठी निवड केलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा न्यायालय, नंदुरबार यांचे नोटीस बोर्डवर व संकेत स्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

सूचनाः

सदर पदभरती संदर्भातील सर्व माहिती सूचना बदल जिल्हा न्यायालय, नंदुरबारचे सूचना फलकावर व https:/nandurbar.dcourts.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्याकरीता उमेदवाराने वेळोवेळी जिल्हा न्यायालयाचे वरील संकेतस्थळाची व सूचना फलकाची पहाणी करावी. यासंदर्भात कोणासही वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

ड) उमेदवारांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या सत्यप्रती (सत्यप्रत करण्याचे अधिकार असलेल्या अधिकारी/व्यक्ती यांनी सत्यप्रती केलेल्या) सादर कराव्यात.

१. जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोंडल्याचे प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र / एस. एस.सी.बोर्ड प्रमाणपत्र (School Leaving Certificate/Birth Certificate issued by Competent Authority / Board Certificate of SSC)
२. उमेदवाराने धारण केलेल्या शैक्षणिक पात्रतेची गुणपत्रके व प्रमाणपत्रे.
३. संगणक व संगणकाशी संबंधित उपकरणे वापरण्याचे व हाताळणीचे ज्ञान दर्शविणारे प्रमाणपत्र अथवा संबंधित परीक्षा *उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र.*
४. मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे ज्ञान असल्यास प्रमाणपत्र.
५. फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे किंवा फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली नसल्याचे किंवा शिस्तभंगाची कारवाई झालेली नसल्याचे तसेच जाहिरातीत नमुद सर्व सूचना व अटी मान्य असल्याचे स्वयं घोषणापत्र. (अस्सल स्वरुपात)
६. उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास, त्याच्या कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
७. विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत जर तिने लग्नानंतर तिचे नाव बदलले असेल तर तिच्या नावाच्या बदलाबाबत दस्तऐवज उदाहरणार्थ शासकीय राजपत्र.
८. अर्जामध्ये दिलेल्या इतर माहिती संदर्भातील आवश्यक कागदपत्रे.
९. न्यायालयीन प्रशासनाने मागणी केल्यास सदर दस्तऐवज सादर करणे अनिवार्य आहे.

इ) उमेदवारांना असेही सूचित करण्यात येते की ,

१. अर्ज विहित नमुन्यातच सादर करावा. (जाहिरातीसोबत दिलेल्या परिशिष्ट 'अ' नमुन्यात) व **<u>सोबत गावातील किंवा परिसरातील व्यक्तीने दिलेले चारित्र प्रमाणपत्र जोडावे.</u>**
२. *अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.*
३. विहित नमून्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
४. उमेदवाराने अर्ज भरताना संपूर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी (असल्यास), जन्मतारीख त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या वैध कागदपत्रानुसार अचूक रित्या नमूद करावे.
५. मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी सोबत आणाव्यात.
६. उमेदवाराने जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रता, अटी आणि निकष पूर्ण केले असतील अशा उमेदवारांचे अर्ज पुढील प्रक्रीयेकरीता योग्य ठरविणेत येतील.
७. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत / स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
८. जे उमेदवार शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्यांचे विभाग कार्यालय प्रमुखांची लेखी परवानगी घेऊनच अर्ज करावा. अशी परवानगी मुलाखतीचे वेळी सादर करावी.
९. कोणतेही मूळ कागदपत्र किंवा प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात येऊ नयेत.

फ) उमेदवारांकरीता इतर आवश्यक सूचना -

१. भरती प्रक्रिया कोणत्याही वैध कारणामुळे रद्द झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, याबाबत सर्व अधिकार संगणक समिती, जिल्हा न्यायालय, नंदुरबाने स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

२. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल अथवा नियुक्त झाल्यास त्याला / तिला पदावरून काढून टाकण्यात येईल.

३. केवळ अर्ज दाखल केला यावरून ई-सेवा केंद्रांच्या पोर्टा केबिन्ससाठी कंत्राटी कर्मचारी या पदाच्या परीक्षांचा, मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही.

४. उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेत प्रात्यक्षिक चाचणी *(आवश्यक वाटल्यास) व मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, नंदुरबार जिल्हा न्यायालयाच्या प्रशासनाकडे* याबाबत तोंडी अथवा लेखी केलेली कोणतीही तक्रार / दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

५.पात्र उमेदवारांना प्रात्यक्षिक चाचणी (आवश्यक वाटल्यास) व मुलाखतीसाठी नियोजित तारखांना स्वःखर्चाने हजर रहावे लागेल. त्याबाबतचा कुठलाही खर्च उमेदवारास कार्यालयाकडून मिळणार नाही.

६. सदर पदाकरीता अर्ज सादर करताना अर्जासोबत फोटो प्रमाणपत्र (Photo ID) म्हणून मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी जोडलेल्या दस्तऐवजाचीच मूळ प्रत प्रात्यक्षिक चाचणी (आवश्यक वाटल्यास) व मुलाखतीवेळी घेऊन यावयाची आहे.

७. निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर त्याची नेमणूक रद्द करणेत येईल.

८. उमेदवारांची निवड ही प्रात्यक्षिक चाचणी (आवश्यकता वाटल्यास) व मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार केली जाईल. पुढील ११ महिने किंवा अनुदान उपलब्ध असे पर्यंत यापैकी जे काही अगोदर होईल तोपर्यंत))

९. सदरची नेमणूक ही कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात करणेत येणार असून त्या नेमणूकीबाबत कोणताही दावा करता येणार नाही. तसेच सदरची नेमणूक पुढील ११ महिने किंवा अनुदान उपलब्ध असेपर्यंत यापैकी जे काही अगोदर होईल तोपर्यंत मर्यादीत असणार आहे. सदरची नेमणूक करताना उमेदवाराचे कामकाज व नाम. उच्च न्यायालयाचे वेळोवेळी प्राप्त होणारे निर्देश विचारात घेवून देणेत येईल.

१०. सदरच्या पदाकरीता दरमहा रु.१५,०००/- इतके मानधन / वेतन अनुज्ञेय राहिल. सदर वेतनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही भत्ते अनुज्ञेय रहाणार नाहीत.

११.या निवड प्रक्रियेत संगणक समिती, जिल्हा न्यायालय, नंदुरबारने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

१२. वरिल सेवा कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे उमेदवाराची सेवा कधीही समाप्त करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, नंदुरबार यांना राहतील.

आदेशावरुन,

दिनांक : ०६ /११/२०२६

District & Sessions Court Nandurbar

z/c प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

परिशिष्ट - "अ"
जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

प्रति,

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
टोकर तलाव रोड, नंदुरबार ता. व जि. नंदुरबार - ४२५४१४

उमेदवाराचे छायाचित्र

विषय :- "ई-सेवा केंद्रांच्या पोर्टा केबिन्ससाठी कंत्राटी कर्मचारी" पदासाठी अर्ज.

महोदय,

मी विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो / करते की, मी ई-सेवा केंद्रांच्या पोर्टा केबिन्ससाठी कंत्राटी कर्मचारी या पदावर आपल्या कार्यालयात काम करण्यास इच्छुक असून माझी तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे देत आहे.

१.	उमेदवाराचे संपुर्ण नाव	
२.	पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोड सह)	
३.	राष्ट्रीयत्व	
४.	उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय?	
५.	दूरध्वनी / मोबाईल क्रमांक	
६.	ई-मेल ID	
७.	लिंग	
८.	धर्म	
९.	जात व प्रवर्ग	
१०.	जन्म दिनांक	
११.	जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस उमेदवाराचे वय	
१२.	उमेदवाराची वैवाहिक स्थिती (अविवाहित/ विवाहित / घटस्फोटीत/ विधवा/ विधुर)	
१३.	**उमेदवार जाहिरातीतील नमुद असलेल्या कोणत्या तालुक्यातील पदाकरीता ' इच्छुक आहे त्या तालुक्याचे नाव** **उमेदवाराने आपल्या प्राधान्यक्रमाप्रमाणे तालुके नमुद करावे.** (नंदुरबार, शहादा, तळोदा व अक्कलकुवा)	१. ..... २. ..... ३. ..... ४. .....
१४.	उमेदवार Para Legal Volunteers (PLV) आहे का?	

१५. शैक्षणिक अर्हता :-

अ.क्र.	शैक्षणिक अर्हता	परीक्षा मंडळाचे नाव	उत्तीर्ण वर्ष	एकूण गुण	प्राप्त गुण	टक्केवारी

१६.	**इतर विशेष / अतिरिक्त अर्हता**	
१७.	ज्ञात भाषा	
१८.	शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यासः	
	अ) कार्यालयाचे नाव	
	ब) धारण केलेले पद	
	क) नियुक्ती दिनांक	
	ड) अर्ज करताना सदर कार्यालयाद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे का? (असल्यास माहिती जोडावी)	
१९.	उमेदवारा विरुदध कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित आहे का ? (असल्यास माहिती जोडावी)	होय / नाही
२०.	उमेदवारास न्यायालयाने दोषी ठरवले आहे का ? (असल्यास माहिती जोडावी)	होय / नाही

मी, प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो / करते की, वरील नमुद केलेली माहिती अचूक तसेच माझे पूर्ण माहितीने दिली असून परिपूर्ण सत्य आहे. वरील माहिती खोटी व चुकीची आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे. त्याबाबत भविष्यात माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. मला कधीही नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आलेले नाही किंवा मला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवलेले नाही किंवा माझ्या विरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नाही.

दिनांकः
ठिकाणः

उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी खालील अनुक्रमांकानुसार लिहावी.

१. ----------

२. ----------

३. ----------

४. ----------

५. ----------

६. ----------

७. ----------

८. ----------

९. ----------

१०. ----------

११. ----------

१२. ----------

१३. ----------

१४. ----------

१५. ----------

बंधपत्र

मी _____ वय अंदाजे _____ वर्षे, _____ यांचा मुलगा / मुलगी राहिवासी _____ _____ हे समजतो / समजते की, या नियुक्तीच्या आधारे मला जिल्हा न्यायालयाच्या कामकाजासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली काही कामे पूर्ण करण्याची जबाबदारी दिली जाऊ शकते. तसेच, न्यायालयाद्वारे अवलंबल्या जाणाऱ्या विविध कार्यपद्धती आणि धोरणांचे प्रशिक्षण मला दिले जाईल, ज्यासाठी विशेष ज्ञानाची आवश्यकता असते.

मी हे देखील मान्य करतो/करते की, माझी नियुक्ती केल्यामुळे नंदुरबार जिल्हा न्यायालयाने कदाचित इतर अशा उमेदवारांचा विचार केला नसेल, जे हे काम पूर्ण करण्यासाठी योग्य असू शकले असते. जर मी हे काम पूर्ण करण्याबाबतच्या अटींचे उल्लंघन केले, तर नंदुरबार जिल्हा न्यायालयाने आकारलेला दंड भरण्यास मी जबाबदार असेन. हा दंड 'निश्चित नुकसान भरपाई' (Liquidated Damages) म्हणून आणि अशा उल्लंघनामुळे होऊ शकणाऱ्या संभाव्य नुकसानीचा एक वाजवी पूर्व-अंदाज म्हणून मानला जाईल.

यांच्याद्वारे अंमलात आणले :-

_____
अर्जदाराची स्वाक्षरी व नाव

१. साक्षीदार :- _____
(नावे आणि पत्ते) _____

२. साक्षीदार :- _____
(नावे आणि पत्ते) _____